दुरध्वनी क्रमांक 0217-2744641
email Id-ps.sadarbazar.cpsol@mahapolice.gov.in

**प्रेस नोट**  **दिनांक** 15/02/2025

**चोरीचा दाखल गुन्हा सदर बझार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण पथकाने चार तासाचे आत उघडकिस आणून गुन्ह्यातील रोख रक्कम 1,00,000/- व 50 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असे एकूण रुपये 5,00,000/- किमतीचा माल हस्तगत करुन गुन्ह्यातील 100 टक्के माल हस्तगत केला.**

---

फिर्यादी नामे सौ.विजया राजेश बोब्बा वय.39 वर्षे रा.सी-10 गौरीशंकर अपार्टमेन्ट रामलाल चौक, सोलापूर यांनी त्यांचे राहते घरातून दिनांक 17/01/2025 ते 24/01/2025 या कालावधीत **रोख रक्कम 100,000/- रुपये** , एक सुमारे **30 ग्रॅम वजनाचे सोन्याची चैन**, सुमारे प्रत्येकी 10 ग्रॅम वजनाचे दोन सोन्याच्या अंगठ्या असे एकूण **20 ग्रॅम सोन्याचे अंगठ्या** असा सर्वमाल **रुपये 5,00,000/- किमतीचा अज्ञात चोरट्याने** चोरुन नेला वगैरे मजकुरची फिर्याद दिल्याने ती सदर बझार पोलीस ठाणेस गु.र.नं. 131/2025 भारतीय न्याय संहिता कलम 2023 चे कलम 305 प्रमाणे दिनांक 14/2/2025 रोजी 16.46 वा. दाखल आहे.

सदर गुन्ह्याचे तपासात कोणत्या प्रकारचा पुरावा नसताना, सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना सहा. औदुंबर आटोळे व पोकॉ सागर गुंड, पोकॉ/ अनमोल लट्टे, उमेश चव्हाण यांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सदर बझार पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रकटिकरण पथकातील पोलीस अंमलदार यांनी नमुद फिर्यादीचे घरी काम करणारे महिलाकडे कसुन तपास करुन त्या महिलेकडून **गुन्ह्यातील 100 टक्के माल आहे त्या परिस्थितीत** जप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, मा.विजय कबाडे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ, मा.श्री. यशवंत गवारे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-2, श्री. अजित लकडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. भालचंद्र ढवळे पोलीस निरीक्षक (गुन्हे),यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि नितीन शिंदे, सहा.फौ./ औदुंबर आटोळे, पोहेकॉ संतोष पापडे, पोहेकॉ/ शहाजहान मुलाणी, पोहेकॉ/सागर सरतापे, पोहेकॉ/ राजेश चव्हाण, पोकॉ/ सागर गुंड, अनमोल लट्टे, उमेश चव्हाण, हणमंत पुजारी, सोमनाथ सुरवसे, मपोहेकॉ स्नेहा किणगी यांनी केली आहे.

सही
15/2/25
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**सदर बझार पोलीस ठाणे**
**सोलापूर शहर**

